लोकमत




गडहिंग्लज येथे 'रवळनाथ'च्या वार्षिक सभेत संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी मार्गदर्शन केले. यावेळी संचालक व शाखाध्यक्ष उपस्थित होते.

# सभासदांना ४५ लाखांचे जादा शेअर्स

## 'रवळनाथ'च्या रौप्यमहोत्सवाची भेट : चौगुले यांची वार्षिक सभेत घोषणा

■ लोकमत न्यूज नेटवर्क

**गडहिंग्लज** : रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त प्रत्येक वर्षाला १०० प्रमाणे ७५४२ सभासदांना ४५ लाख २७ हजारांचे जादा शेअर्स देणार आहोत, अशी घोषणा श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीचे अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी २४ व्या वार्षिक सभेत केली.

यावेळी वयाची पंचाहत्तरी पूर्ण केलेले सभासद, सेवानिवृत्त सभासद आणि दहावी-बारावी व पदव्युत्तर पदवी संपादित केलेल्या सभासदांच्या पाल्यांचा सत्कार झाला.

कऱ्हाड व पुणे येथे नवीन शाखा सुरू करण्यासह विषयपत्रिकेवरील सर्व विषयांना मंजुरी मिळाली. चौगुले म्हणाले, सर्व शाखेत मायक्रो एटीएमची सुविधा उपलब्ध करून देणार असून, ॲपद्वारे बँकिंग सेवा अधिक गतिमान करण्याचा प्रयत्न आहे.

संचालक रामचंद्र निळपणकर, महादेव पाटील, किरण पोतदार, सुशांत करोळे, प्रदीप अभ्यंकर, नंदकुमार ढोलके यांनी आर्थिकपत्रके वाचली. सीईअ दत्तात्रय मायदेव यांनी विषयपत्रिका, त व्यवस्थापक शिवानंद घुगरे यांनी मागी सभेचा वृत्तांत वाचला. संचाल शिवशंकर उपासे, नवनाथ शिंदे, समि चौगुले व सविता पाटील, शाखाध्य जनार्दन केसरकर, रामचंद्र पाटी प्रकाश हेरेकर, कुमार पाटील, राजारा पाटील व विद्या बांदिवडेकर उपस्थि होते. दत्ता पाटील यांनी सूत्रसंचलन के उपाध्यक्ष वासुदेव मायदेव यांनी आभ मानले.

पुढारी

# ‘रवळनाथ’च्या सभासदांना - ४५ लाखांचे जादा शेअर्स

## एम. एल. चौगुले : रौप्यमहोत्सवाची भेट, वार्षिक सभेत घोषणा

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**

रौप्यमहोत्सवानिमित्त प्रत्येक वर्षाला शंभरप्रमाणे ७ हजार ५४२ सभासदांना ४५ लाख २७ हजारांचे जादा शेअर्स देण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतला आहे, अशी घोषणा श्री रवळनाथ को-ऑप हौसिंग फायनान्स सोसायटीचे संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी केली. येथील सूर्या सांस्कृतिक सभागृहात आयोजित २४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. कराड व पुणे येथे नवीन शाखा काढण्यासह विषयपत्रिकेवरील सर्व विषयांना चर्चेअंती एकमताने मंजुरी देण्यात आली.

चौगुले म्हणाले, अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने सभासद व ग्राहकांना तत्पर सेवा देण्यासाठी संस्था नेहमीच प्रयत्नशील आहे. लवकरच सर्व शाखेत मायक्रो एटीएमची सुविधा उपलब्ध करून देणार आहोत. तसेच स्वतःच्या ॲपद्वारे बँकिंग सेवा गतिमान करण्याचा संचालक मंडळाचा मानस आहे.

संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डी. के. मायदेव यांनी विषय पत्रिकेचे वाचन केले. व्यवस्थापक शिवानंद घुगरे यांनी मागील सभा वृत्तांत वाचन केले. संचालक एस. एम. करोशे, प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर, प्रा. एम. पी. पाटील, नंदकुमार शेळके (सी.ए), प्रदीप अभ्यंकर, प्रा. किरण पोतदार यांनी आर्थिक पत्रांचे वाचन केले. यावेळी वयाची पंच्याहत्तरी पूर्ण केलेले सभासद, सेवानिवृत्त सभासद आणि दहावी, बारावी व पदव्युत्तर पदवी पूर्ण झालेल्या सभासदांच्या पाल्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. प्रारंभी ज्येष्ठ सभासदांच्या हस्ते श्री रवळनाथ व काळभैरव प्रतिमापूजन आणि कुंडीतील रोपाला पाणी घालून सभेला सुरुवात करण्यात आली.




गडहिंग्लज : २४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलताना संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले. शेजारी सर्व संचालक सदस्य व शाखा चेअरमन आदी.

यावेळी प्रा. डॉ. शिवशंकर उपासे, प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर, प्रा. डॉ. नवनाथ शिंदे, प्रा. डॉ. एम. पी. पाटील, प्रा. डॉ. किरण पोतदार, प्रदीप अभ्यंकर, सुशांत करोशे, नंदकुमार शेळके (सीए), डॉ. सुमिधा चौगुले, सविता पाटील यांच्यासह गडहिंग्लज शाखा चेअरमन प्रा. जे. बी. केसरकर, कोल्हापूर शाखा चेअरमन प्रा. आर. एस. पाटील (सी.ए), निपाणी शाखा चेअरमन प्राचार्य पी. एम. हेरेकर, जयसिंगपूर शाखा चेअरमन प्राचार्य डॉ. के. एस. पाटील, नेसरी शाखा चेअरमन प्राचार्य आर. बी. पाटील, चंदगड शाखा चेअरमन प्राचार्या डॉ. विद्या बांदिवडेकर, सर्व शाखेचे सल्लागार व सभासद उपस्थित होते. गडहिंग्लज शाखा सल्लागार प्रा. दत्ता पाटील यांनी सूत्रसंचालन केले. उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव यांनी आभार मानले.

सकाळ

सकाळ

# सभासदांना ४५ लाखांचे जादा शेअर्स

## चौगुले; 'रवळनाथ'च्या रौप्यमहोत्सवी वर्षाची भेट, वार्षिक सभेत घोषणा




गडहिंग्लज : 'रवळनाथ'च्या २४ व्या वार्षिक सभेत बोलताना संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले. शेजारी सर्व संचालक व शाखा चेअरमन.

गडहिंग्लज, ता. १३ : रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त प्रत्येक वर्षाला शंभरप्रमाणे ७ हजार ५४२ सभासदांना ४५ लाख २७ हजाराचे जादा शेअर्स देण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतला आहे, अशी घोषणा श्री रवळनाथ को-ऑप हौसिंग फायनान्स सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी केली.

येथील सूर्या सांस्कृतिक सभागृहात आयोजित संस्थेच्या २४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. कराड व पुणे येथे नवीन शाखा काढण्यासह विषय पत्रिकेवरील सर्व विषयांना चर्चेअंती एकमताने मंजुरी देण्यात आली.

चौगुले म्हणाले, "अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने सभासद व ग्राहकांना तत्पर सेवा देण्यासाठी संस्था नेहमीच प्रयत्नशील आहे. लवकरच सर्व शाखेत मायक्रो एटीएमची सुविधा उपलब्ध करून देणार आहोत. तसेच स्वत:च्या ॲपद्वारे बँकिंग सेवा गतिमान करण्याचा संचालक मंडळाचा मानस आहे."

विषय पत्रिकेचे वाचन संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डी. के. मायदेव यांनी केले. मागील सभेचा वृत्तांत वाचन व्यवस्थापन शिवानंद घुगरे यांनी केले. संचालक एस. एम. करोशे, प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर, प्रा. डॉ. एम. पी. पाटील, नंदकुमार शेळके, प्रदीप अभ्यंकर, प्रा. डॉ. किरण पोतदार यांनी आर्थिक पत्रांचे वाचन केले.

या वेळी वयाची पंच्याहत्तरी पूर्ण केलेले सभासद, निवृत्त सभासद आणि सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा सत्कार करण्यात आला. गडहिंग्लज शाखा सल्लागार प्रा. दत्ता पाटील यांनी सूत्रसंचालन केले. उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव यांनी आभार मानले.

सभेला संचालक डॉ. शिवशंकर उपासे, डॉ. नवनाथ शिंदे, सुशांत करोशे, डॉ. समिधा चौगुले, सविता पाटील, गडहिंग्लज शाखाध्यक्ष प्रा. जे. बी. केसरकर, कोल्हापूर शाखाध्यक्ष प्रा. आर. एस. पाटील, निपाणी शाखाध्यक्ष प्राचार्य पी. एम. हेरेकर, जयसिंगपूर शाखाध्यक्ष प्राचार्य डॉ. के. एस. पाटील, नेसरी शाखाध्यक्ष प्राचार्य आर. बी. पाटील, चंदगड शाखाध्यक्ष प्राचार्या डॉ. विद्या बांदिवडेकर यांच्यासह गडहिंग्लज, चंदगड, नेसरी, कोल्हापूर, जयसिंगपूर, बेळगावी, निपाणी, कुडाळ शाखेचे सल्लागार व सभासद उपस्थित होते.